# प्रेस नोट

## महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७

# गणेशोत्सव आरास/डेकोरेशन स्पर्धा

सोलापूर शहरातील सर्व गणेशोत्सव मंडळांना आवाहन करण्यात येते की, सोलापूर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवाच्या कालावधीत मतदार जनजागृती संदर्भात आरास स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेमध्ये सजीव देखावा, भित्तीपत्रके, हालता देखावा व इतर सर्व प्रकारच्या प्रचार साहित्याचा समावेश करण्यात येणार आहे.

स्पर्धेत चार विषय असून त्यात १) शंभर टक्के मतदार नोंदणी २) भरघोस मतदान, स्वयंस्फुर्त मतदान ३) प्रभावी आचरण, प्रभावी मतदान ४) स्वच्छ उमेदवार, स्वच्छ मतदार याप्रमाणे कोणत्याही एका विषयावर भाग घेता येईल. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांक ५००० रु, द्वितीय क्रमांक - ३००० रु, तृतीय क्रमांक - १००० रु. याप्रमाणे रोख बक्षिस व मानचिन्ह तसेच सहभागी झालेल्या सर्व गणेशोत्सव मंडळांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी सहभागी होवून नागरिकांना मतदार होण्याचे व मतदानाचे महत्व पटवून देवून देण्याच्या दृष्टीने आरास सजावट करावी जेणेकरुन महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये शंभर टक्के मतदान होईल असे आवाहन उपआयुक्त श्री. श्रीकांत मायकलवार यांनी केले.